मिरा-भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रसिद्धीपत्रक

# • थकीत पाणीपट्टी कर तात्काळ भरावा

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाच्या वतीने मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी वसुली मोहिम सुरु आहे. सदर मोहिमेअंतर्गत पाणीपट्टी वसूली करणे, थकबाकीदारांच्या जलजोडण्या खंडीत करणे इत्यादी स्वरूपाची कारवाई मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत माहे. जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ या कालावधीच्या पाणीपट्टी देयकांची देय दिनांक (Due Date) २०/०६/२०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे. देय दिनांक (Due Date) नंतर पाणीपट्टी भरणा न झालेल्या मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची कारवाई करण्यात येत आहे. ज्यांची जलजोडणी खंडीत केली आहे त्यांनी पाणीपट्टी व शासकीय शुल्काचा भरणा केल्यास त्यांची जलजोडणी पूर्ववत करण्यात येईल. शहरात जे थकबाकीदार असतील त्यांनी लवकरात लवकर पाणीपट्टी थकबाकी भरावी आणि आपला जलपुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी.

नागरिकांनी पाणीपट्टी भरणा केल्यास पाण्याच्या सुविधा व इतर विकास कामांसाठी तसेच पाण्याच्या व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध होईल त्यामुळे शहरात पाण्याची सुविधा व्यवस्थित चालू ठेवण्यात सहकार्य होईल.

मिरा भाईंदर शहरातील नागरीकांना महानगरपालिकेतर्फे थकीत पाणीपट्टी देयकाचा भरणा लवकरात लवकर भरणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.